| | | |
|---|---|---|
| | **P.R.O Office ,Crime Branch,Pimpri Chinchwad**<br>**Address:- Office Of The Commissioner Of Police ,**<br>**Premlok Park Chinchwad,**<br>**Maharashtra - 411033** | |

**प्रेसनोट दिनांक – ०८/११/२०२४**

विधानसभा निवडणूक २०२४ चे पार्श्वभुमीवर आचारसंहिता लागु झालेपासुन अवैधरित्या रोख रक्कमेची वाहतुक होऊ नये याकरीता पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे पोलीस आयुक्त श्री विनय कुमार चौबे यांनी पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे हद्दीत विविध ठिकाणी नाकाबंदी नेमणे बाबत तसेच अचानकपणे् विविध ठिकाणी वाहने तपासणीकरिता अधिकारी व अंमलदार यांना सुचना दिल्या असता त्या अनुषंगाने १) खंडणी विरोधी पथकाकडील पोलीस अधिकारी व अंमलदार हे चिंखली पोलीस स्टेशन हद्दीत कृष्णानगर चौक येथे दिनांक ०७/११/२०२४ रोजी २३/३० वा.ते ०८/११/२०२४ रोजी ०२/३० वा पर्यंत विशेष नाकाबंदी करीत असताना नाकाबंदी दरम्यान मारुती सेलेरिओ कार क्रमांक एम एच १४ एच डी ९४३७ हिची तपासणी केली असता सदर वाहनाची तपासणी केली असता सदर वाहनामध्ये रोख रक्कम १,५१, ५०० रुपये रोख रक्कम मिळुन आली सदर रोख रक्कमेबाबत इसम नामे १.सुमित नितीन धुमाळ रा.चंद्रोदय कॉम्पलेक्स, आकुर्डी २ अविनाश माधव कांबळे वय २३ वर्षे रा वडगांव घेणंद रोड साई लॉन्स जवळ आळंदी पुणे यांचे ताब्यातुन घेउन पुढील कार्यवाही करीत आहेत.

२) दि ७/११/२०२४ रोजी सोमाटणे टोल नाका,तळेगांव दाभाडे सदर दिवशी गुन्हे शाखा पथक क्र ५ चे पोलीस उप निरीक्षक राहुल कोळी व त्यांचे पथकाने अचानक नाकाबंदी दरम्यान वाहन क्रमांक एम एच १४ एच क्यु ८९०० या वाहनातुन विजय मारूती मांडुळे वय २९ वर्षे रा मु थोरम पो.करंजगांव ता मावळ जि पुणे २. संकेत भाउ वाडेकर वय २३ वर्षे रा. तुंगार्ली ता लोणावळा जि पुणे हे प्रवास करीत असताना त्यांचे ताब्यातुन २,००,००० लाख रूपये रोख रक्कम ताब्यात घेउन पुढील कार्यवाहीकरीता निवडणुक भरारी पथकाचे ताब्यात दिले

३) तसेच दि ७/११/२०२४ रोजी सोमाटणे टोल नाका तळेगांव दाभाडे येथेच तळेगांव दाभाडे पोलीस स्टेशन सपोनि यमगर व स्टॉफने वाहन क्र एम एच १४ एफ एस ९४०० या वाहनातील इसम अक्षय रामादास आटोळे वय १९ वर्षे रा जनाई निवास काटेपुरम चौक सांगवी यांचे ताब्यातुन ८५,२३० रूपये रोख रक्कम ताब्यात घेऊन पुढील कार्यवाहीकरिता निवडणुक कक्षाकडील भरारी पथकाचे ताब्यात दिली.

**जनसंपर्क अधिकारी**
**पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय**